नि. फौ. ख. क्र. ६८/२०२१
सरकार वि. गणेश
निशाणी क्रं. २०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०१ चा पुरावा शपथेवर सुरू**
नावः विवेकानंद सर्जेराव ठेंगडे.
वयः ३८ वर्षे धंदाः शेती,
पत्ताः पळसवाडी, ता. खुलताबाद, जि.औरंगाबाद.

**अभियोग पक्षातर्फे सरकारी वकिल श्री. एस. ए. बनसोडे यांच्यामार्फत साक्षीदाराचा सरतपास सुरु**

**०१.** मी आरोपींना ओळखतो. ते माझे शेजारी आहेत. घटना दि. १५ जुन २०२० रोजी शेतात घडली. घटनेच्या वेळेस माझ्यासोबत आई-वडील, पत्नी व बहिण होते. सकाळी साडेआठ ते नऊ च्या दरम्यान आरोपी व अभिषेक मच्दींद्र ठेंगडे व वैभव मच्छींद्र ठेंगडे बक-या घेवुन माझ्या शेताच्या बांधला आले होते. ते सर्व माझ्या शेताच्या बांधावरील झाड तोडून बक-यांना तोडून टाकत होते. माझ्या वडीलाने त्यांना झाडे तोडू नका, बक-या तिकडे हाकला असे सांगितले असता वडीलाला शिवीगाळ केली. मी तेथे गेलो असता आरोपी क्र. २ ने माझे दोन्ही हात पकडले व आरोपी क्र. १ ने माझ्या कानाच्या मागे डोक्यात कु-हाड मारली. त्यामुळे मी रक्तबंबाळ झालो. माझ्या डाव्या पायाला कु-हाड मारली. कोणी मारली हे मला सांगता येणार नाही. तेथे आरडा ओरड झाली त्यामुळे माझी पत्नी आई तसेच बहिण तेथे आल्या तसेच एक व्यक्ती तेथे आला व त्याने मला रोडवर आणले. माझ्या चुलत भावाने मला मोटारसायकलवर दवाखान्यात नेले. त्यानंतर पोलीस स्टेशनला गेलो. आता मला फिर्याद दाखवण्यात आली. ती तीच आहे. त्यावर माझी सही आहे. मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादला **नि. क्र. २१** देण्यात येते. मी पहिले खुलताबाद येथील सरकारी दवाखान्यात गेलो व त्यानंतर औरंगाबाद येथील सरकारी दवाखान्यात उपचार घेतला तसेच खाजगी रुग्णालयात उपचार घेतला. ज्या कु-हाडीने मला मारले ती दाखवल्यास मी ओळखू शकतो. आरोपी क्र. १ आज न्यायालयात हजर आहे. आता मला जीपीआर क्र. १५/२०२५ दाखवण्यात आली. याच कु-हाडीने मला मारहाण झाली. त्याला **अर्टीकल- अ** देण्यात येते. **सरतपास पूर्ण.**

**मध्यंतराची वेळ झाल्याने साक्षीदाराचा उलटतपास मध्यंतराच्या वेळेपर्यंत उलटतपास तहकुब.**

दिनांक १६.०१.२०२६

श्रवणोत्तर स्विकृती

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.01.16 17:45:02 +0530

**(जी. डी. गुरनुले)**
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खुलताबाद.

नि. फौ. ख. क्र. ६८/२०२१
सरकार वि. गणेश
निशाणी क्रं. २०

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०१ चा पुरावा शपथेवर सुरू**
नावः विवेकानंद सर्जेराव ठेंगडे.
वयः ३८ वर्षे धंदाः शेती,
पत्ताः पळसवाडी, ता. खुलताबाद, जि.औरंगाबाद.

**मध्यंतरानंतर साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. डी.पी.काळे यांच्यामार्फत शपथेवर सुरु.**

**०२.** माझे शिक्षण १० वी पर्यंत झाले. मला वाचता लिहिता येते. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १७५ मधे माझ्या नावाने क्षेत्र नाही. हे म्हणणे खरे आहे की, गट नं.१७४ मधे आरोपीचे क्षेत्र आहे. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १७४ व गट नं. १७५ च्या मधे तारकंपाउंड आहे. गट नं. १७५ च्या बाजुने तारकंपाउंडला लागून ८ फटी रुंदीचा रस्ता आहे. त्या रस्त्याच्या तारकंपाउंड शेजारी लिंबाचे, सुबाभळीचे व चंदनाचे झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. १७४ च्या बाजुने तारकंपाउंडला लागुन झाडे आहेत. गट नं. १७५ मधे एकाबाजुने तारकंपाउंड आहे. गट नं. १७५ चा एका बाजुने नाला व एका बाजुने जमीन मोकळी आहे.

**०३.** माझ्या वडीलाने त्यांना झाडे तोडू नका, बक-या तिकडे हाकला असे सांगितले ही बाब मी पोलीसांना जबाब देतांना असे सांगितले होते किंवा नाही ते मला आठवत नाही. मी पोलीसांना जबाब देतांना आरोपी क्र. २ ने माझे दोन्ही हात पकडले, वडीलाला शिवीगाळ केली, कानाच्या मागे डोक्यात कु-हाड मारली, त्यामुळे मी रक्तबंबाळ झालो, माझ्या डाव्या पायाला कु-हाड मारली, हे सांगितले होते. हे माझ्या जबाबात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. घटनेच्या दिवशी दुपारी दोन ते तीन वाजता पोलीसांना घटनेबाबत सांगितले.

**०४.** मी खुलताबाद येथील दवाखान्यात सकाळी दहा ते साडेदहा वाजेच्या दरम्यान गेलो. हे म्हणणे खरे आहे की, डॉक्टरांनी मला औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात पाठवले. मी खुलताबाद येथील दवाखान्यात अर्धातास होतो. डॉक्टरांनी तेथे टाके दिले व पट्टी लावली. मला औरंगाबाद येथील दवाखान्यात जाण्याकरीता एक ते दिड तास लागला. मी औरंगाबाद येथील दवाखान्यात दोन तास होतो. तेथे दोन तास उपचार केला. मी औरंगाबाद येथील सरकारी दवाखान्यातून घरी आलो. खुलताबाद येथील दवाखान्यापासून औरंगाबाद येथील दवाखान्यापर्यंत माझ्यासोबत पोलीस कर्मचारी नव्हता. मी घरी आल्याच्या दुस-या दिवशी खाजगी रुग्णालयात गेलो. पोलीसांनी माझ्याकडून दवाखान्याचे कागदपत्र घेतले. खाजगी दवाखान्याची कागदपत्र मी

पोलीसांना दिले नाहीत. खाजगी दवाखान्यात एक ते दिड महिना उपचार घेतला. उपचारादरम्यान पोलीसांसोबत भेट झाली नाही. पोलीसांसोबत भेट फक्त गावात एक दिवस आले त्यादिवशी झाली.

०५. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. १७४ ला जाण्याकरीता गट नं. १७५ मधून रस्ता होता. हे म्हणणे खरे आहे की, गट नं. १७५ ला लागून पूर्व बाजुला रस्ता आहे. हे म्हणणे खरे आहे की, हा ररस्ता इतर शेतकरी वापरतात. मी गट नं. १७५ ची मोजणी केली. हे म्हणणे खरे आहे की, त्या मोजणीमध्ये आमची जमीन कमी भरते. हे म्हणणे खरे आहे की, आमची जमीन बाजुचे लगत शेतक-यांकडे ती जमीन निघते. हे म्हणणे खरे आहे की, लगतचे शेतकरी त्यांची जमीन मोजत नाही व आमची जमीन देत नाहीत. हे म्हणण खरे आहे की, आमच्या शेताच्या एका बाजुला आरोपीची वडीलोपार्जित जमीन आहे.

०६. घटनेच्या वेळेस शेतात कोणतेही पिक नव्हते. आरोपीच्या शेतात पिक नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस कोरडया जमीनी होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीकडे किती बक-या होत्या हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, झाडे किंवा फांद्या तोडण्याकरीता धारदार कु-हाड लागते. आता मला अर्टीकल-अ दाखवण्यात आले. ती कु-हाड गंजलेली आहे. अर्टीकल-अ ला चिखल लागलेले नाही.

०७. पोलीस घटनेच्या दिवशी आले. चार पोलीसांशिवाय कोणी आले नाही. आरोपी व मी सोडलेल्या रस्त्यामधे कु-हाड पडलेली होती. आरोपींची जमीन आमच्या शेताच्या पूर्व दिशेला आहे. आरोपीच्या शेताला लागून रसता आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या बाजुला आमची जमीन आहे. झाडे तारकंपाउंडच्या पूर्व बाजुला आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी आमची कमी भरलेली जमीन देण्याकरीता मी त्यांच्यासोबत वाद घालत असतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींकडे बक-या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींचे शैक्षणिक नुकसान होण्याकरीता खोटी केस केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, अभिषेक मच्छींद्र ठेंगडे व वैभव मच्छींद्र ठेंगडे हे घटनेच्या दिवशी शाळेत होते. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी फिर्याद न वाचून दाखवता माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीत काय लिहिले हे सांगता येणार नाही. दवाखान्यामध्ये माझा चुलता भाऊ, माझा साला हे सोबत होते व या व्यतिरिक्त कोणी नव्हते. घटनेबाबत खुलताबाद दवाखाना व्यतिरिक्त् कोठेही सांगितले नाही.

०८. गट नं. १७५ चे कागदपत्र पोलीसांना दिले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, गट नं. १७५ मधे माझी जमीन नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने कु-हाडीने मारहाण केली नाही.

हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मारहाण केली नाही व शिवीगाळ केल नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने अतिक्रमण केलेले क्षेत्र देण्याकरीता खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

दिनांक १६.०१.२०२६ श्रवणोत्तर स्विकृती

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by GANESH DATTA GURNULE
Date: 2026.01.16 17:45:10 +0530

**(जी. डी. गुरनुले)**
सह प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, खुलताबाद.